आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक  बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

६ ऑगस्ट २०२४ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना 'द कंपॅनियन ऑर्डर ऑफ फिजी' हा फिजीचा सर्वोच्च नागरी पुरस्कार प्रदान

- बांगलादेशातल्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर केंद्रसरकारनं आयोजित केली सर्वपक्षीय बैठक

- बांगलादेशात लष्कर आणि राजकीय नेत्यांनी लोकशाही प्रस्थापित करण्यासाठी एकत्रितपणे काम करण्याचं संयुक्त राष्ट्रांचं आवाहन

- पुणे शहरात झिका विषाणूबाधित रुग्णांची संख्या ६६ वर

**आणि**

- पॅरिस ऑलिम्पिकमध्ये महाराष्ट्राच्या अविनाश साबळेनं रचला इतिहास  तीन हजार मीटर स्टीपलचेस प्रकारात अंतिम फेरीत धडक / विविध स्पर्धांमध्ये भारतीय खेळाडू आज मैदानात

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू सध्या फिजीच्या दौऱ्यावर असून त्यांना आज 'द कंपॅनियन ऑर्डर ऑफ फिजी' हा फिजीचा सर्वोच्च नागरी पुरस्कार प्रदान करण्यात आला. फिजीचे राष्ट्राध्यक्ष विलयम काटोनिवेरे यांनी त्यांना या पुरस्कारानं सन्मानित केलं. फिजीच्या लष्कराकडून मुर्मू यांना 'गार्ड ऑफ द ऑनर' सुद्धा देण्यात आला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी भारत-फीजी संबध दृढ करण्यासंदर्भात फिजीचे राष्ट्राध्यक्ष आणि प्रधानमंत्र्यांबरोबर चर्चा केली. फिजीची राजधानी सुवा इथं आज सकाळी त्यांनी भारतीय समुदायाला संबोधित केलं. फिजीत गेल्या वर्षी

फेब्रुवारीमध्ये भारताच्या सहकार्यानं सुरू करण्यात आलेल्या सौर प्रकल्पाची राष्ट्रपतींनी पाहणी केली. फिजीच्या संसदेला त्यांनी काल संबोधित केलं, यावेळी फीजी आणि भारत यांच्यामधल्या ७५ वर्षांच्या राजनैतिक संबंधांचा त्यांनी उल्लेख केला. फिजीच्या दौऱ्यानंतर राष्ट्रपती मुर्मू ७ ते ९ ऑगस्ट दरम्यान न्यूझीलंडला **जाणार** आहेत. तर १० ऑगस्टला त्या तिमोर लेस्टे देशाला भेट देणार आहेत.

**<><><><><>**

परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर आज संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये बांग्लादेशमधल्या सध्याच्या परिस्थितीवर निवेदन देतील. राज्यसभेत दुपारी अडीच वाजता, तर लोकसभेत साडे तीन वाजता ते निवेदन देतील.

बांग्लादेशच्या मुद्द्यावर चर्चा करण्यासाठी केंद्रसरकारनं आज सकाळी नवी दिल्ली इथं सर्वपक्षीय बैठक आयोजित केली होती. जयशंकर यांनी यावेळी बांग्लादेशमधल्या घडामोडींबद्दल सर्व नेत्यांना माहिती दिली. या बैठकीमध्ये  सर्व पक्षांनी दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केलं. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, गृहमंत्री अमित शाह, केंद्रीय मंत्री तसंच भाजपा अध्यक्ष जे. पी. नड्डा, लोकसभेतले  विरोधी पक्षनेते राहुल गांधी, तृणमूल काँग्रेसचे नेते सुदीप बंदोपाध्याय, राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या सुप्रिया सुळे, यांच्यासह इतर नेते या बैठकीला उपस्थित होते.

**<><><><><>**

बांग्लादेशच्या प्रधानमंत्री  शेख हसीना यांच्या राजीनाम्यानंतर तिथल्या लष्कर आणि राजकीय अधिकाऱ्यांनी देशात शांततापूर्ण लोकशाही प्रस्थापित करण्यासाठी  एकत्र येऊन काम करावं, असं  संयुक्त राष्ट्रांचे  महासचिव अँटोनियो गुटेरेस यांनी म्हटलं आहे. बांगलादेशच्या नागरिकांचे लोकशाही आणि मानवी हक्क अबाधित राहावेत, असं आवाहन त्यांनी केलं आहे.

बांग्लादेशमधल्या सध्याच्या परिस्थितीची संयुक्त राष्ट्रांच्या नेतृत्वाखाली चौकशी व्हायला हवी, अशी मागणी युनायटेड किंगडमच्या सरकारनं केली आहे. बांगलादेशाच्या माजी प्रधानमंत्री शेख हसीना यांच्या निवासस्थानामध्ये घुसून काल आंदोलकांनी तोडफोड केली. त्यानंतर शेख हसीना यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आणि लष्करी विमानातून देश सोडला. या पार्श्वभूमीवर बांग्लादेशमध्ये शांतता आणि लोकशाही कायम राहायला हवी, असं युकेचे परराष्ट्र सचिव डेव्हिड लॅमी यांनी काल सांगितलं.

बांग्लादेशमध्ये हंगामी सरकार स्थापन झाल्यानंतर सर्व निर्णय लोकशाहीच्या तत्वांनुसार घेतले जावेत, असं आवाहन अमेरिकेनं केलं आहे. हिंसा थांबवण्यासाठी तातडीनं पावलं उचलण्याची गरज असल्याचं अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाचे प्रवक्ते मॅथ्यु मिलर यांनी पत्रकारांशी संवाद साधताना सांगितलं.

दरम्यान, बांगलादेशची संसद बरखास्त करून हंगामी सरकार स्थापन करणार असल्याचं बांगलादेशचे राष्ट्रपती मोहम्मद शहाबुद्दीन यांनी ढाका इथं सांगितलं. लष्कर प्रमुख जनरल वकार-उझ-जमान लवकरच विद्यार्थी आणि शिक्षकांच्या प्रतिनिधींची भेट घेणार आहेत. बांग्लादेशमधली सर्व सरकारी आणि खासगी कार्यालयं, तसंच सर्व शैक्षणिक संस्था आज सुरू राहतील, अशी माहिती बांग्लादेशच्या लष्करी सूत्रांनी दिली. १९७१ साली बांगलादेशला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांच्या नातेवाईकांना सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षण देण्याच्या निर्णया विरोधात बांगलादेशमध्ये विद्यार्थ्यांनी आंदोलन छेडलं आहे.

**<><><><><>**

पालघर जिल्ह्यातल्या नंडोरे इथल्या आश्रमशाळेतल्या मुलांना जेवणातून विषबाधा झाल्याचं लक्षात आलं आहे. उलटी, मळमळ, यासारखा त्रास झाल्यानं या मुलांना आज पालघरच्या ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आलं. जिल्ह्यातल्या

आणखी काही आश्रमशाळेतल्या मुलांनाही जेवणातून विषबाधा झाल्याचं दिसून आलं आहे. पालघर ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. चंद्रकांत लोहारे यांनी याबाबत माहिती दिली. या मुलांना रात्रीच्या जेवणातून विषबाधा झाल्याचा प्राथमिक अंदाज असून सध्या ३० मुलं उपचार घेत असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

पुणे शहरात झिका विषाणूची लागण झालेले रुग्ण दिवसेंदिवस वाढत असून ही संख्या ६६वर पोहोचली आहे. यामध्ये २६ गर्भवती महिलांना झिका व्हायरची लागण झालेली आहे. आतापर्यंत झिकाचा संसर्ग झालेल्या चार रुग्णांचा मृत्यू झाला आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाची समिती या चार रुग्णांचं परीक्षण करणार आहे. त्यातून त्यांच्या मृत्यूचं नेमकं कारण स्पष्ट होऊ शकेल.

गेल्या काही दिवसांमध्ये झालेला मुसळधार पाऊस, घाण आणि साचलेल्या पाण्यामुळे मोठ्या प्रमाणावर धोका वाढल्याचं दिसून येत आहे.

**<><><><><>**

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये काल भारताच्या अविनाश साबळेनं  ऐतिहासिक कामगिरी नोंदवली. महाराष्ट्राच्या बीड  जिल्ह्यातल्या अविनाशनं   पुरुषांच्या 3 हजार मीटर स्टीपलचेस प्रकारात  पाचवं स्थान मिळवत स्पर्धेची अंतीम फेरी गाठली. येत्या ८ ऑगस्टला अंतिम फेरी होणार आहे. टेबल टेनिस स्पर्धेच्या पुरुष सांघिक स्पर्धेत आज मानव ठक्कर आणि हरमीत देसाई या भारतीय जोडीला पहिल्या सामन्यात पराभव पत्करावा लागला. चीनच्या जोडीनं या दोघांचा ११-२,११-३,११-७ असा पराभव केला. अंचता शरत कमल दुसरा सामना खेळत आहे. दरम्यान, भालाफेक स्पर्धेत अ गटाची पात्रता फेरीत भारताच्या किशोर जेना यानं ९ वं स्थान मिळवलं.

**महिलांच्या** ५० किलो वजनी गटाच्या उपांत्यपूर्व फेरीत **भारताची कुस्तीपटू विनेश फोगाट आणि** जपानची सुसाकी युई यांच्यात लढत सुरू झाली आहे.

**हॉकीमध्ये** आज भारताचा उपांत्य फेरीतील सामना जर्मनीशी होणार आहे. भारतीय प्रमाण वेळेनुसार हा सामना रात्री १० वाजून ३० मिनिटांनी सुरू होणार आहे. **भालफेक स्पर्धेत**ल्या **ब गटाची पात्रता फेरी** आज होणार असून त्यात भारताचा गोल्डन बॉय **नीरज चोप्रा** सहभागी होणार आहे. हा सामना आज दुपारी ३ वाजून २० मिनिटांनी सुरु होईल. **भारतीय कुस्तीपटू विनेश फोगाट** ५० किलो वजनी गटाच्या उपांत्यपूर्व फेरीत लढणार आहे.

**<><><><><>**

नाशिक शहराला पाणीपुरवठा करणारं गंगापूर धरण ८७ टक्के भरलं आहे. गंगापूर धरणातला पाणीसाठा गेल्या वर्षीच्या यावेळेपेक्षा दोन टक्के जास्त असला तरी जिल्ह्यातल्या २४ जलाशयात मिळून ६१ पूर्णांक ६२ शतांश टक्के साठा शिल्लक आहे. जिल्ह्यातल्या पालखेड धरणात ६६ टक्के आणि दारणा धरण समुहात ८६ टक्के इतका पाणीसाठा आहे. गिरणा धरणातही ७३ टक्के इतका पाणीसाठा आहे. पावसाचा जोर कमी झाल्यामुळे जलसंपदा विभागानं पाण्याचा विसर्ग कमी केला असून सध्या गंगापूरमधून ४७० तर दारणा धरणातून ५ हजार ३५६ आणि नांदूरमध्यमेश्वर बंधाऱ्यातून १५ हजार २७४ क्युसेक विसर्ग सुरू आहे.

**<><><><><>**

तामिळनाडूमधल्या सुलार इथं 'तरंग शक्ती २०२४' या पहिल्या बहुराष्ट्रीय हवाई युद्ध सरावाला आजपासून प्रारंभ होणार आहे. या सरावात भारत, अमेरिका, जर्मनी, फ्रान्स, ऑस्ट्रेलिया, युएई आणि सिंगापूर सह ३० देश सहभागी होत आहेत. यापैकी दहा देश लढाऊ विमानांसह सहभागी होत आहेत. हा सराव दोन टप्प्यांमध्ये आयोजित केला असून पहिला टप्पा आजपासून १४ ऑगस्टपर्यंत

तामिळनाडूतल्या सुलार इथं तर दुसऱ्या टप्प्यातला सराव २९ ऑगस्ट ते २४ सप्टेंबर दरम्यान राजस्थानमधल्या जोधपूर इथं होणार आहे, अशी माहिती भारतीय हवाई दलाचे उपप्रमुख, एअर मार्शल ए पी सिंग यांनी काल नवी दिल्लीत पत्रकारांशी बोलताना दिली. या युद्ध सरावादरम्यान प्रशिक्षण, भारतीय तंत्रज्ञान कंपन्यांना भेट आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचंही आयोजन करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

बीड जिल्ह्यातल्या नागरिकांच्या मूलभूत सुविधा आणि दैनंदिन जीवनातील समस्यांकडे प्रशासनाचं लक्ष वेधण्यासाठी शिवसंग्रामच्या पदाधिकाऱ्यांनी आज नगर पालिका कार्यालयामध्ये ठिय्या आंदोलन केलं. शिवसंग्रामच्या शिष्टमंडळानं मुख्याधिकारी नीता अंधारे यांना विविध मागण्यांचं निवेदन सादर केलं.

बीड शहरातले नागरिक गेली अनेक वर्ष अपुरा पाणी पुरवठा, मोकाट कुत्रे कचरा, रस्त्यावरचे खड्डे यासारख्या समस्यांचा सामना करत असल्याचं या निवेदनात म्हटलं आहे.

**<><><><><>**

देशात गेल्या १० वर्षात नक्षलवादाचा प्रभाव मोठ्या प्रमाणात ओसरल्याचं गृह राज्यमंत्री नित्यानंद राय यांनी आज लोकसभेत पुरवणी प्रश्नाच्या उत्तरात सांगितलं. २००४ ते १४ या कालावधीच्या तुलनेत २०१४ ते २४ या काळात नक्षलवादी घटनांचं प्रमाण ५३ टक्क्यांनी कमी झालं आहे, असं ते म्हणाले. देशात नक्षलवादाचा प्रभाव असलेल्या जिल्ह्यांची संख्या कमी होऊन ३८ वर पोहोचल्याचं त्यांनी सांगितलं. गेल्या १० वर्षात नक्षलवादी घटनांमध्ये मृत पावलेले सुरक्षा दलाचे जवान तसंच नागरिकाचं प्रमाण देखील कमी झालं आहे, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

सायबर गुन्ह्यांचा निपटारा करण्याच्या उद्देशानं देशभरात आतापर्यंत १ कोटी ९२ लाख सीम कार्डांची सेवा खंडित करण्यात आल्याची माहिती आज राज्यसभेत अर्थराज्यमंत्री पंकज चौधरी यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात दिली. सायबर घोटाळा प्रकरणात सरकार शून्य सहिष्णूता धोरण अंमलात आणत असल्याचं त्यांनी सांगितलं.

**//<><><><><>//**

आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक  बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
६ ऑगस्ट २०२४ - मंगळवार